# जिल्हा परिषद,यवतमाळ
## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
## शिक्षण विभाग,प्राथमिक
## जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत,आर्णी रोड,यवतमाळ

E-mail – eopriytl@gmail.com Website:-www.zpyavatmal.gov.in


जा.क्र.यजिप/शिविप्रा/आस्था-प्राथ/कावि/२७१३/२०२६ दिनांक २८/०९/२०२६

**अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी-२०२५**

**प्रति**,

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत
पवित्र पोर्टलद्वारे टप्पा-१ रुपांतरीत फेरीमधील शिफारस पात्र
अनु क्र. ५, ८, १७, १९, २४, ३८, ६६, ८०, ८८, ९३,९५,
१०४,११२,१३०,१३२,१३७,१४६,१७७ मधील कागदपत्रे
पडताळणी करीता अनुपस्थित उमेदवार

**विषय**:- पवित्र पोर्टल प्रणाली अंतर्गत शिक्षक पदभरती कागदपत्रे पडताळणीस उपस्थित राहणेबाबत.

**संदर्भ**:- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दिनांक ०१/०१/२०२६, दिनांक २०/०१/२०२३, दिनांक ३०/०३/२०२६, दिनांक ०२/०४/२०२६, दिनांक २४/०७/२०२६
२. मा. आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र क्र.मरापप/पवित्र पोर्टल/पदभरती/२०२६/दिनांक २८/०८/२०२६
३. पवित्र पोर्टल प्रणाली वरील दिनांक २१/०९/२०२६ रोजीची प्राप्त यादी.
४. या कार्यालयाचे पत्र क्र. २६५४/२०२६ दिनांक २३/०९/२०२६

शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी-२०२५ नुसार शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत मुलाखतीशिवाय पदनिवडीचा विकल्प दिल्यानुसार पवित्र पोर्टल प्रणालींतर्गत टप्पा-१ रुपांतरीत फेरीमधील शासनाने शिफारस केलेल्या शिक्षक पदभरतीतील एकुण १९० उमेदवारांची निवड यादी कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने शिफारस पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दिनांक २८/०९/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.

त्यानुसार उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर स्व-प्रमाणपत्रात नोंदविलेल्या माहितीची सर्व मुळ कागदपत्रे व इमेलवर अलाहीदा देण्यात येणा-या तपासणी सुचीप्रमाणे साक्षांकित प्रतिसह खालीलप्रमाणे नियोजनानुसार वसंतराव नाईक सभागृह, जिल्हा परिषद यवतमाळ येथे सकाळी ठिक १०.०० वाजता स्वत: उपस्थित राहुन कागदपत्रे पडताळणीची कार्यवाही पुर्ण करुन घेण्याबाबत कळविण्यात आले होते.

परंतु दिनांक २८/०९/२०२६ रोजी जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीसाठी उपस्थित राहु शकले नाही त्यांना कागदपत्रे पडताळणीसाठी दिनांक ३०/०९/२०२६ व ०१/१०/२०२६ रोजी अंतीम संधी देण्यात येत असुन सदर दिवशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे. सदर दिनांकास कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित न राहील्यास संबंधित अनुपस्थित उमेदवारांची नावे राज्य स्तरावर कळविण्यात येईल व अनुपस्थिती बाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील याची नोंद घ्यावी.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलिपी**:- १. मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव.